# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## कार्यकारी सारांश

**आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आर्थिक वर्ष २०१९-२० साठी एकूण वार्षिक महसूलाची गरज आणि वीजदर निश्चितीकरण.**

**(महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग प्रकरण क्र. ४८/२०१६)**

# कार्यकारी सारांश

**अ) पुर्वपिठीका :-**

मा. आयोगाने आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आर्थिक वर्ष २०१९-२० या तृतीय नियंत्रण कालावधीकरीता, बहुवर्षिय वीजदर विनियम २०१५ दि. ८ डिसेंबर २०१५ रोजी पारित केले. सदर विनियमाप्रमाणे बहुवर्षिय वीजदर याचिका दि. १५ जानेवारी २०१६ पर्यंत मा. आयोगास सादर करणे अपेक्षित होते. तथापि, सदर याचिका सादर करण्यास मुदत वाढ देण्यात येऊन, दि. १५ फेब्रुवारी २०१६ पर्यंत याचिका सादर करण्याचा आदेश मा. आयोगाने दि. १५ जानेवारी २०१६ रोजी दिला.

सदर बहुवर्षिय वीजदर याचिकेमध्ये विविध धोरणात्मक बाबींचा असलेला समावेश, वीजदर तत्वांमध्ये व वीजदर संरचना निश्चित करताना विविध पातळीवर कराव्या लागणा-या चर्चा इ. बाबींमुळे महावितरणला याचिका दाखल करण्यास विलंब झाला असला तरीसुध्दा मा. आयोगाने झालेल्या विलंबाला सुट द्यावी करावी अशी विनंती महावितरणतर्फे मा. आयोगास करण्यात आली आहे. दि. ३ मार्च २०१६ रोजी आ. व. २०१६-१७ ते आ.व. २०१९-२० या नियंत्रण कालावधीकरीता बहुवर्षिय वीजदर याचिका मा. आयोगास सादर करण्यात आली.

महावितरणच्या सदर बहुवर्षिय वीजदर याचिकेबाबत मा. आयोग व ग्राहक प्रतिनिधी यांच्याकडून अधिक माहितीविषयी (डेटा गॅप्स्) विचारणा करण्यात आली होती. त्यानुसार जादा माहितीची महावितरणतर्फे पुर्तता करण्यात आली आहे. मा. आयोगातर्फे दि. २१ मार्च २०१६ रोजी प्रथम तांत्रिक वैधता सत्र आयोजिण्यात आले होते. तद्नंतर दि. २९ एप्रिल २०१६ रोजी द्वितीय तांत्रीक वैधता सत्र आयोजिण्यात आले होते. मा. आयोगाच्या दि. ५ मे २०१६ रोजीच्या पारित केलेल्या पत्रामध्ये नमूद बैठक मुद्दयां (Minutes of Meeting) अनुसार महावितरणला त्रुटींची व तांत्रिक वैधता सत्रा दरम्यान उपस्थित मुद्दयांची पुर्तता करुन सुधारीत याचिका मा. आयोगास सादर करण्याबाबत आदेश देण्यात आला.

त्या प्रमाणे विद्युत अधिनियम २००३, कलम ६२ व बहुवर्षिय वीजदर विनियम २०१५ नुसार तृतीय नियंत्रण कालावधीकरीता खालील बाबींचा समावेश असणारी सुधारीत बहुवर्षिय वीजदर याचिका महावितरण, मा. आयोगास सादर करीत आहे.

- आर्थिक वर्ष २०१४-१५ चे अंतिम अचूक समायोजन (वार्षिक लेखांकनानुसार)
- आर्थिक वर्ष २०१५-१६ चे तात्पुरते समायोजन (डिसेंबर २०१५ पर्यंत उपलब्ध असणा-या वीज विक्री व वीज खरेदी आकडेवारी नुसार)

- आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आ. व. २०१९-२० या नियंत्रण कालावधी करीता एकूण महसुली गरज.

- प्रचलित वीज दरानुसार आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आ. व. २०१९-२० साठी अनुमानित एकूण महसुली तुट.

- सदर महसुली तुटीची पुर्तता करण्याकरीता वर्गवारी निहाय प्रस्तावित वीजदर.

**ब) आर्थिक वर्ष २०१४-१५ चे अंतिम अचूक समायोजन**

आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या वार्षिक लेखांकनावर आधारीत आ. व. २०१४-१५ साठीची एकूण महसुली गरज **रु. ५६,५९४ कोटी** इतकी असून, मा. आयोगाने दि. २६ जुन २०१५ रोजी दिलेल्या प्र.क्र. १२१/२०१४ च्या बहुवर्षिय वीजदर याचिके वरील आदेशानुसार मान्य केलेली आर्थिक वर्ष २०१४-१५ साठीची महसुली गरज पुढील तक्त्यात तपशिलवार दर्शविण्यात येत आहे.

मा. आयोगाने मान्य केलेली महसुली गरज व प्रत्यक्षातील महसुली गरज यामधील फरक हा प्रामुख्याने वीज खरेदी खर्चातील तफावतीमुळे निर्माण झाला असून सदर तफावत ही रु. २,८२३ कोटींची कृषी ग्राहकांच्या वीज विक्रीस दि. २६ जून २०१५ च्या आदेशाद्वारे मान्य न केल्याने झाली आहे. वीज खरेदी खर्चातील तफावत असली तरी अंतिम अचूक समायोजनाच्या परिकक्षेत असल्याने मा. आयोगाने आ. व. २०१४-१५ च्या अंतिम अचूक समायोजनास मान्यता दयावी, अशी विनंती करण्यात येत आहे.

मा. आयोगाने दि. २९ एप्रिल २०१६ रोजी दुसरे तात्रिंक वैधता सत्र आयोजित केले होते सदर तांत्रिक वैधता सत्रा दरम्यान प्रयास एनर्जी गृप या ग्राहक प्रतिनिधी संघटनेने कृषी वीज विक्री व वितरण हानी बद्दल काही आक्षेप नोंदविले. सदर तांत्रिक वैधता सत्रातील चर्चेचे मुद्दे व प्रयासने मा. आयोगा पुढे मांडलेले मुद्दे हे मुख्य याचिकेत जोडलेले **परिशिष्ट १७** मध्ये नमुद करण्यात आले आहे.

| तपशिल | आ.व. २०१४-१५ (मंजुरीत) | आ.व. २०१४-१५ (प्रत्यक्ष) | तफावत |
|---|---|---|---|
| वीज खरेदी खर्च | ३९,६९४ | ४३,६१४ | ३,९२० |
| संचलन व सुव्यवस्थेविषयक खर्च | ५,९५७ | ६,१५८ | २०१ |
| घसारा खर्च | १,९४० | २,०८१ | १४१ |
| दीर्घ मुदतीच्या कर्जाऊ भांडवलावरील व्याज | १,५९१ | १,५११ | (८०) |
| खेळते भांडवल, ग्राहकांच्या व वितरण प्रणाली वापर कर्त्याच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज | ७२८ | ८९१ | १६३ |
| इतर वित्तिय आकार | ३८ | ३० | (८) |
| बुडित रकमेसाठीची तरतूद | २१० | ३४७ | १३७ |
| अन्य खर्च | २० | ४० | २० |
| आयकर | ०.०४ | - | (०) |
| पारेषण अनुज्ञप्तिधारकांस प्रदान केलेला पारेषण आकार व महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे शुल्क तथा आकार | ५,४९० | ५,४७५ | (१५) |
| प्रोत्साहन / सवलत | २३० | २४६ | १६ |
| पुर्व कालीन खर्च | - | (२,७२०) | (२,७२०) |
| डीएसएम साठीचा खर्च | १ | | (१) |
| **एकूण महसुली खर्च** | **५५,८९९** | **५७,६७२** | **१,७७३** |
| भाग भांडवला वरील परतावा | १,४१२ | १,४४७ | ३५ |
| **एकूण महसूलाची गरज** | **५७,३११** | **५९,११९** | **१,८०८** |
| वजा : वीजदरा व्यतिरिक्त उत्पन्न | १,७६१ | १,९५८ | १९७ |
| वजा: वहन आकारातून मिळालेले उत्पन्न | २० | ३ | (१७) |
| वजा: ओपन ॲक्सेस चार्जेस पासूनचे उत्पन्न | २९६ | ३८० | ८४ |
| वजा: वर्गवारी बदलल्यामुळे मिळालेला महसूल | १०२ | - | (१०२) |
| अधिक:आर.एल.सी. परतावा | ३८ | ४६ | ८ |
| अधिक: ए.एस.सी. परतावा | - | २ | २ |
| अधिक : नफा /तोटा वितरीत केल्याचा परिणाम | | (२३२) | (२३२) |
| **किरकोळ दरापासून आवश्यक असणारा एकूण महसूल** | **५५,१७०** | **५६,५९४** | **१,४२४** |
| वजा: वीज विक्रीतून मिळणारा एकूण महसूल | ५५,२५९ | ५५,१३५ | (१२४) |
| वजा: अतिरिक्त वीज विक्रीतून मिळणारा महसूल | १८० | १८९ | ९ |
| **महसूलातील तूट / (आधिक्य)** | **(२६९)** | **१,२७१** | **१,५४०** |

**क) आर्थिक वर्ष २०१५-१६ चे तात्पुरते समायोजन.**

आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी महसुली गरजेची परिगणना ही बहुवर्षिय वीजदर विनियम २०११ व डिसेंबर २०१५ पर्यंत उपलब्ध वीज खरेदी व वीज विक्रीच्या प्रत्यक्ष माहितीच्या व उर्वरीत तीन महिन्यांकरिता अंदाजित वीज खरेदी व वीज विक्रीच्या अनुमानित माहितीच्या आधारे केली आहे.

मा. आयोगाने प्र. क्र. १२१/२०१४ च्या बहुवर्षिय वीजदर आदेशानुसार मंजुर केलेल्या आर्थिक वर्ष २०१५-१६ साठीची महसुली गरज ही रु. ५६,६१३ कोटी इतकी होती. तद्नंतर डिसेंबर १५ पर्यंतच्या उपलब्ध प्रत्यक्ष माहितीच्या आधारे सदर महसुली गरज ही रु. ५९,१४४ कोटी इतकी अनुमानित करण्यात आली. त्यानुसार सदरचा तपशिल पुढील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे.

(रु. कोटी)

| तपशिल | आ. व. २०१५-१६ (मंजुरीत) | आ. व. २०१५-१६ (अंदाजित) | तफावत |
|---|---|---|---|
| वीज खरेदी खर्च | ४१,२४९ | ४४,०३४ | २,७८५ |
| संचलन व सुव्यवस्थेविषयक खर्च | ६,७१२ | ६,७२५ | १३ |
| घसारा खर्च | २,१३४ | २,३३३ | १९९ |
| दीर्घ मुदतीच्या कर्जाऊ भांडवलावरील व्याज | १,६८० | १,५४४ | (१३६) |
| खेळते भांडवल, ग्राहकांच्या व वितरण प्रणाली वापर कर्त्याच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज | ७८८ | ७२२ | (६६) |
| इतर वित्तिय आकार | ३९ | ३१ | (८) |
| बुडित रकमेसाठीची तरतूद | २१० | २५८ | ४८ |
| अन्य खर्च | २१ | ४२ | २१ |
| आयकर | ०.०४ | | (०) |
| पारेषण अनुज्ञप्तिधारकांस प्रदान केलेला पारेषण आकार व महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे शुल्क तथा आकार | ३,६२७ | ४,०७० | ४४३ |
| प्रोत्साहन / सवलत | २४२ | २५८ | १६ |
| आकस्मिक खर्चांसाठीच्या राखीव निधीची तरतूद | १०१ | | (१०१) |
| डि.एस.एम.साठीचा खर्च | ८ | | (८) |
| **एकूण महसुली खर्च** | **५६,८१२** | **६०,०१९** | **३,२०७** |
| भाग भांडवला वरील परतावा | १,५३० | १,५८२ | ५२ |
| **एकूण महसूलाची गरज** | **५८,३४२** | **६१,६०१** | **३,२५९** |
| वजा : वीजदरा व्यतिरिक्त उत्पन्न | १,८४७ | २,०५५ | २०८ |
| वजा: वहन आकारातून मिळालेले उत्पन्न | २१ | ३ | (१८) |
| वजा: ओपन ॲक्सेस चार्जेस पासूनचे उत्पन्न | ३११ | ३९९ | ८८ |
| अधिक:आर.एल.सी .परतावा | ४५० | | (४५०) |
| **किरकोळ दरापासून आवश्यक असणारा एकूण महसूल** | **५६,६१३** | **५९,१४४** | **२,५३१** |

| तपशिल | आ. व. २०१५-१६ (मंजुरीत) | आ. व. २०१५-१६ (अंदाजित) | तफावत |
|---|---|---|---|
| वजाः वीज विक्रीतून मिळणारा एकूण महसूल | ५८,९७८ | ५४,९११ | (४,०६७) |
| वजाः अतिरिक्त वीज विक्रीतून मिळणारा महसूल | - | १८९ | १८९ |
| **महसूलातील तूट / (आधिक्य)** | **(२,३६५)** | **४,०४४** | **६,४०९** |

परिणामी **रु. ४०४४ कोटी** इतकी महसुली तुट झाल्याचे दिसून येते व सदर तफावत मुख्यत्वे वीज खरेदी खर्च, राज्यांतर्गत पारेषण आकार खर्च व वीज विक्रीतून मिळणारा महसुल यामुळे झाली आहे.

### ड) आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आ. व. २०१९-२० साठी वार्षिक महसुली गरज

आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आ. व. २०१९-२० या तृतीय नियंत्रण कालावधी करीता वार्षिक महसुली गरज ही बहुवर्षिय वीजदर विनियम २०१५ व विविध घटकांच्या अंदाजा नुसार केली आहे.

### १) वीज विक्रीचे अंदाज.

तृतीय नियंत्रण कालावधीकरीता वीज विक्री अंदाजित करण्याकरीता महावितरणने दि. २६ जून २०१५ च्या आदेशानुसार मंजुर केलेले वृध्दी दरांप्रमाणे (काही वर्गवारी वगळता) करण्यात आलेली आहे. कारण मा. आयोगाने मंजुर केलेले वृध्दीदर व प्रत्यक्षातील वृध्दीदर हे काही वर्गवारी वगळता जवळपास सारखे आहेत.

वर्गवारी निहाय तृतीय नियंत्रण कालावधीसाठी वीज विक्री पुढील तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

दक्षलक्ष युनिटस

| प्रवर्ग | आर्थिक वर्ष २०१६-१७ (अंदाजित) | आर्थिक वर्ष २०१७-१८ (अंदाजित) | आर्थिक वर्ष २०१८-१९ (अंदाजित) | आर्थिक वर्ष २०१९-२० (अंदाजित) |
|---|---|---|---|---|
| उच्चदाब | | | | |
| उच्चदाब - १ औद्योगिक | २३,६२९ | २४,५७४ | २५,५५७ | २६,५७९ |
| उच्चदाब -२ वाणिज्यिक | २,२५४ | २,४३५ | २,६२९ | २,८४० |
| उच्चदाब -३ रेल्वे | ७७ | ७७ | ७७ | ७७ |
| उच्चदाब -४ सार्वजनिक पाणी पुरवठा | १,५४१ | १,६९५ | १,८६५ | २,०५१ |
| उच्चदाब - ५ कृषि | १,०४१ | १,०९३ | १,१४८ | १,२०५ |
| उच्चदाब - ६ एकगठ्ठा पुरवठा | २२६ | २२६ | २२६ | २२६ |
| उच्चदाब - ८ तात्पुरता पुरवठा | ५ | ५ | ५ | ५ |
| उच्चदाब - ९ सार्वजनिक सेवा | ९३४ | १,००९ | १,०९० | १,१७७ |
| उच्चदाब - १० बंदरे (पोर्टस) | ७६ | ८० | ८४ | ८८ |
| उच्चदाब-महानिर्मिती सहाय्यकारी पुरवठा | ८३ | ८३ | ८३ | ८३ |
| **एकूण उच्चदाब** | **२९,८६७** | **३१,२७७** | **३२,७६३** | **३४,३३१** |
| वाढ (%) | - | ५% | ५% | ५% |

लघुदाब वर्गवारीसाठी वीज विक्री अंदाजित करतांना वास्तववादी धोरण अवलंबविण्यात आलेले आहे व त्यानुसार साधारणतः मीटर नसलेल्या १,००,००० कृषी ग्राहकांना मीटर बसविण्यात येणार असून सरासरी ४ अश्वशक्ती व १,१८५ हा कृषी वीज वापर निर्देशांक विचारात घेऊन सदर नियंत्रण कालावधी करीता वीज विक्री अंदाजित करण्यात आली आहे. महावितरणने सदर मिटर नसलेल्या ग्राहकांचा वीज वापर अंदाजित करुन तेवढाच वीज वापर मिटर बसविल्याने मीटर सह कृषी वीज वापराच्या वर्गवारी मध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे.

दक्षलक्ष युनिटस

| प्रवर्ग | आर्थिक वर्ष २०१६-१७ (अंदाजित) | आर्थिक वर्ष २०१७-१८ (अंदाजित) | आर्थिक वर्ष २०१८-१९ (अंदाजित) | आर्थिक वर्ष २०१९-२० (अंदाजित) |
|---|---|---|---|---|
| **लघुदाब** | | | | |
| लघुदाब - १ घरगुती | १९,४०३ | २०,९५० | २२,६१९ | २४,४२३ |
| लघुदाब - २ बिगर घरगुती | ४,३१४ | ४,५२९ | ४,७५६ | ४,९९४ |
| लघुदाब - ३ सार्वजनिक पाणी पुरवठा योजना | ७१२ | ७५५ | ८०० | ८४८ |
| लघुदाब -४ कृषि मीटर रहित वीजदर | ११,५२९ | ११,०५५ | १०,५८१ | १०,१०७ |
| लघुदाब -४ कृषि मीटरवर आधारितवीजदर | १७,६८० | २०,०९९ | २२,७८४ | २५,७६४ |
| लघुदाब-५ औद्योगिक - यंत्रमाग | १,७४० | १,९३२ | २,१४४ | २,३८० |
| लघुदाब -५ औद्योगिक | ४,९७४ | ५,२७२ | ५,५८८ | ५,९२४ |
| लघुदाब - ६ पथदिवे | १,७७६ | १,९५३ | २,१४८ | २,३६३ |
| लघुदाब - ७ तात्पुरता विद्युत पुरवठा | १८ | १८ | १८ | १८ |
| लघुदाब - ८ जाहिराती आणि होर्डिंग्ज | ३ | ३ | ३ | ३ |
| लघुदाब - ९ स्मशानभुमी व दफनभुमी | १ | १ | १ | १ |
| लघुदाब -१० सार्वजनिक सेवा | ३१७ | ३३९ | ३६३ | ३८८ |
| लघुदाब -प्रीपेड ग्राहक(घरगुती) | १५ | १६ | १८ | २० |
| वीज पुरवठा खंडीत केलेले ग्राहक | - | - | - | - |
| **एकूण लघुदाब** | **६२,४८३** | **६६,९२४** | **७१,८२६** | **७७,२३४** |
| **महावितरणचे वीज विक्री (फ्रेंचायजी वगळून)** | **९२,३५०** | **९८,२०१** | **१०४,५८९** | **१११,५६६** |
| वाढ (%) | | **६%** | **७%** | **७%** |
| फ्रेंचायजी यांचे एकुण वीज विक्री | ४,४६१ | ४,८५२ | ५,२८० | ५,७४९ |
| **महावितरणचे एकूण वीज विक्री (फ्रेंचायजी सह)** | **९६,८११** | **१०३,०५३** | **१०९,८७०** | **११७,३१५** |
| वाढ (%) | | **६%** | **७%** | **७%** |

## २) वीज खरेदी

वीज खरेदी बाबत अंदाज वर्तविताना महाविरतणने वीज करार केलेल्या सर्व स्त्रोतांचा तसेच आ.व. २०१६-१७ ते आ. व. २०१९-२० या कालावधीमध्ये उपलब्ध होऊ शकणारे वीज निर्मिती प्रकल्प यांचा देखील विचार केला आहे. तसेच वीज खरेदी ही मेरीट ऑर्डर डिस्पॅच (MoD) या तत्वानुसार कमीत कमी खर्चात वीज उपलब्ध

व्हावी यासाठी प्रयत्न करण्यात आलेला आहे. तृतीय नियंत्रण कालावधीकरीता वीज खरेदीचे स्त्रोत निहाय अंदाज पुढील तक्त्यात दर्शविण्यात आलेले आहेत.

| स्त्रोत | आर्थिक वर्ष २०१६-१७ (अंदाजित) | | | आर्थिक वर्ष २०१७-१८ (अंदाजित) | | | आर्थिक वर्ष २०१८-१९ (अंदाजित) | | | आर्थिक वर्ष २०१९-२० (अंदाजित) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वीज खरेदी द.ल.यु. | खर्च रु. कोटी | दर रु./युनिट | वीज खरेदी द.ल.यु. | खर्च रु. कोटी | दर रु./युनिट | वीज खरेदी द.ल.यु. | खर्च रु. कोटी | दर रु./युनिट | वीज खरेदी द.ल.यु. | खर्च रु. कोटी | दर रु./युनिट |
| महानिर्मिती | ४६,६८३ | १९,७२२ | ४.२२ | ५०,१७३ | २०,८२८ | ४.१५ | ५४,११६ | २२,६२२ | ४.१८ | ५९,१०६ | २४,०८४ | ४.०७ |
| एनटीपीसी | २४,२२९ | ६,९८१ | २.८८ | २४,५८१ | ७,३१८ | २.९८ | २५,६५६ | ७,३९७ | २.८८ | २६,२१७ | ७,५३६ | २.८७ |
| एनपीसीआयएल | ५,४७० | १,३१८ | २.४१ | ५,४७० | १,३१८ | २.४१ | ५,४७० | १,२८३ | २.३५ | ५,४८५ | १,३२२ | २.४१ |
| एसएसपी | १,२१० | २४८ | २.०५ | १,२१० | २४८ | २.०५ | १,२१० | २४८ | २.०५ | १,२१३ | २४९ | २.०५ |
| पेंच | १३६ | २८ | २.०५ | १३६ | २८ | २.०५ | १३६ | २८ | २.०५ | १३७ | २८ | २.०५ |
| जेएसडब्ल्यू | १,९३४ | ५१० | २.६४ | १,९३४ | ५०४ | २.६१ | १,९३४ | ५०० | २.५८ | १,९४० | ५०३ | २.५९ |
| डॉडसन | ११६ | २६ | २.२९ | ११६ | २७ | २.३३ | ११६ | २८ | २.४१ | ११६ | २३ | १.९७ |
| एन.सी.ई. | १२,९५७ | ७,३१९ | ५.६५ | १५,६१७ | ८,९२८ | ५.७२ | १८,२५६ | १०,५०८ | ५.७६ | २१,१९२ | १२,२६७ | ५.७९ |
| सी.जी.पी.एल | ५,१५८ | १,२१३ | २.३५ | ५,१५८ | १,२२२ | २.३७ | ५,१५८ | १,२३१ | २.३९ | ५,१७२ | १,२४८ | २.४१ |
| अदानी | १८,३५८ | ६,१९७ | ३.३८ | १९,०५४ | ६,८७४ | ३.६१ | १९,२२८ | ६,९५३ | ३.६२ | १८,९९६ | ६,९५८ | ३.६६ |
| रतन इंडीया | ४८ | ९९७ | | - | ९८३ | | - | ९८३ | | २११ | १,०४५ | |
| एमको | १,४८९ | ४९६ | ३.३३ | १,४८९ | ४९९ | ३.३५ | १,४८९ | ५०२ | ३.३७ | १,४९३ | ५०६ | ३.३९ |
| पॉवर ग्रीड | - | २,२४० | | - | २,६०० | | - | २,८४० | | - | ३,०८० | |
| **एकूण** | **११७,७८९** | **४७,२९७** | **४.०२** | **१२४,९३९** | **५१,३७६** | **४.११** | **१३२,७६९** | **५५,१२४** | **४.१५** | **१४१,२७८** | **५८,८४८** | **४.१७** |

तसेच वीज खरेदी करार केलेल्या विविध स्त्रोतांद्वारे वीज खरेदी करतांना सर्वात जास्त कार्यक्षमता असलेल्या स्त्रोताची निवड करण्यात आलेली असून खर्चिक वीज स्त्रोत वगळून सदर निर्मिती केंद्र बंद असल्यास त्यांना स्थिर आकार देखील नाकारण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे महानिर्मितीचे काही निर्मिती केंद्रे बंद करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| वीज निर्मिती केंद्र | स्थिर आकारासाठी प्रस्ताव |
|---|---|
| चंद्रपूर युनिट १ व २ | कोणताही स्थिर आकाराशिवाय निर्मिती केंद्र बंद करण्याचा प्रस्ताव. |
| कोराडी युनिट ५ व ६ | कोराडी युनिट ६ आ. व. २०१६ -१७ साठी व कोराडी युनिट ५ आ. व. २०१७-१८ ते २०१९-२० साठी बंद करण्याचा प्रस्ताव स्थिर आकार @ २०% किंवा मा. आयोगाच्या मान्यतेनुसार. |
| परळी युनिट ३ | नियंत्रण कालावधीकरीता कोणताही स्थिर आकार न देता पुर्णता बंद करण्याचा प्रस्ताव. |
| परळी युनिट ४ व ५ | २०% क्षमता आकार (महानिर्मितीने दिलेल्या माहिती नुसार) किंवा मा. आयोगाच्या मान्यतेनुसार |
| भुसावळ युनिट २ | नियंत्रण कालावधीकरीता कोणताही स्थिर आकार न देता पुर्णता बंद करण्याचा प्रस्ताव. |

**३) वितरण हानी.**

गेल्या काही वर्षात महावितरणने वितरण हानीमध्ये लक्षणीय घट करण्यात यश मिळविले आहे. वितरणहानी कमी करण्याचे महावितरणचे प्रयत्न चालूच राहणार असून किंबहूना अधिक मोठया प्रमाणावर वितरण हानी कमी करण्याबाबत महावितरण प्रयत्नशिल राहील. तथापि येथे नमूद करण्यात येते की, वितरण हानी कमी करणे ही वेळ लागणारी प्रक्रिया असून एका ठराविक पातळीनंतर वितरण हानी कमी करणे अत्यंत कठीण असते. त्यामुळे मा. आयोगाने आ.व. २०१५-१६ करीता मान्य केलेल्या वितरण हानी पातळीपेक्षा ०.२५% ने वितरण हानी प्रति वर्ष कमी होईल असे अपेक्षित आहे.

४) **वायर व पुरवठा व्यवसायाचे विलगीकरण**

बहुवर्षिय वीजदर विनियम २०१५, कलम ६८ मध्ये वितरण परवानाधारकांच्या लोखांकनाचे, वायर व पुरवठा या व्यवसायांमध्ये विलगीकरण करण्याबाबत प्राविधान करण्यात आलेले आहे. मात्र महावितरणने लेखांकन पध्दतीमध्ये प्रत्यक्षात वायर व पुरवठा व्यवसायाचे विलगीकरण केलेले नसले तरी विनियमांतील तरतुदींनुसार विविध घटकांचे वायर व पुरवठा असे विलगीकरण करण्यात येत आहे.

| तपशिल | वायर व्यवसाय | वितरण व्यवसाय |
|---|---|---|
| वीज खरेदी खर्च | ०% | १००% |
| संचलन व सुव्यवस्था खर्च | ६५% | ३५% |
| घसारा | ९०% | १०% |
| दीर्घ मुदतीच्या कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ९०% | १०% |
| खेळत्या भांडवलीवरील व्याज | १०% | ९०% |
| ग्राहकांच्या सुरक्षा ठेवींवरील व्याज | १०% | ९०% |
| बुडीत रक्कमेसाठीची तरतुद | १०% | ९०% |
| आयकर | ९०% | १०% |
| आकस्मिक खर्चासाठी राखीव निधीची तरतुद | ९०% | १०% |
| समभाग भांडवलावरील परतावा | ९०% | १०% |
| वीजदरा व्यतिरिक्त संकीर्ण महसूली उत्पन्न | १०% | ९०% |
| आंतरराज्य पारेषण आकार | ०% | १००% |
| राज्यातंर्गत पारेषण आकार | ०% | १००% |

**५) तृतीय नियंत्रण कालावधीकरीता एकूण वार्षिक महसुलाची गरज**

तृतीय नियंत्रण कालावधीकरीता एकुण वार्षिक महसुलाची गरज ही विविध घटकांच्या अंदाजानुसार व बहुवर्षिय वीजदर विनियम २०१५ च्या तरतुदींनुसार करण्यात आलेले आहे. तसेच प्रचलित वीजदरांनुसार तृतीय नियंत्रण कालावधीकरीता वीज विक्री केल्यास मिळणारा महसूल व निर्माण होणारी महसुली तुट अंदाजित करण्यात आली आहे.

सदर महसुली गरजेचा तपशिल पुढील तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

(रु. कोटी)

| तपशिल | आ.व. २०१६-१७ (अंदाजित) | आ.व. २०१७-१८ (अंदाजित) | आ.व. २०१८-१९ (अंदाजित) | आ.व. २०१९-२० (अंदाजित) |
|---|---|---|---|---|
| वीज खरेदी खर्च | ४७,२९७ | ५१,३७६ | ५५,१२४ | ५८,८४८ |
| संचलन व सुव्यवस्थेविषयक खर्च | ७,३८८ | ८,१९२ | ९,४१० | १०,३९४ |
| घसारा खर्च | २,७२३ | ३,२०२ | ३,६२८ | ४,००३ |
| दीर्घ मुदतीच्या कर्जाऊ भांडवलावरील व्याज | १,७३४ | १,८९२ | १,८६७ | १,७१७ |
| खेळते भांडवल व ग्राहकांच्या व वितरण प्रणाली वापरकर्त्याच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज | ८४२ | ९०३ | ९७९ | १,०३८ |
| बुडित रकमेसाठीची तरतूद | २५८ | २५८ | २५८ | २५८ |
| अन्य खर्च | ४४ | ४६ | ४९ | ५१ |
| पारेषण अनुज्ञप्तिधारकांस प्रदान केलेला पारेषण आकार व महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे शुल्क तथा आकार | ४,२१२ | ४,७३० | ५,५११ | ५,७९६ |
| प्रोत्साहन / सवलत | २७१ | २८५ | २९९ | ३१४ |
| आकस्मिक खर्चांसाठीच्या राखीव निधीची तरतूद | ११९ | १४२ | १६५ | १८३ |
| **एकूण महसुली खर्च** | **६४,८८८** | **७१,०२६** | **७७,२९०** | **८२,६०३** |
| भाग भांडवला वरील परतावा | ८१७ | ८६८ | १,८४९ | १,८५९ |
| **एकूण महसूलाची गरज** | **६५,७०५** | **७१,८९४** | **७९,१४०** | **८४,४६२** |
| वजा : वीजदरा व्यतिरिक्त उत्पन्न | ७५८ | ७९६ | ८३६ | ८७८ |
| वजाः वहन आकारातून मिळालेले उत्पन्न | ३ | ३ | ३ | ४ |
| वजाः ओपन ॲक्सेस चार्जेस पासूनचे उत्पन्न | ४१९ | ४४० | ४६२ | ४८५ |
| **किरकोळ दरापासून आवश्यक असणारा एकूण महसूल** | **६४,५२५** | **७०,६५५** | **७७,८३८** | **८३,०९६** |
| वजाः वीज विक्रीतून मिळणारा एकूण महसूल | ५५,२२६ | ५८,६७१ | ६२,३९२ | ६६,४१६ |
| वजाः वीज विक्रीतून मिळणारा अतिरिक्त महसूल | १,०१५ | ७८८ | ८९९ | ९३० |
| **महसूलातील तूट / (आधिक्य)** | **८,२८४** | **११,१९६** | **१४,५४८** | **१५,७५०** |

## ६) एकूण महसुली तुट.

आर्थिक वर्ष २०१४-१५ व आ. व. २०१५-१६ साठीची महसुली तुट, बहुवर्षिय वीजदर याचिका च्या पुर्नविचार याचिकेच्या (प्र.क्र. १२१/२०१५) कॅरींग कॉस्टचा परिणाम, आ. व. २०१४-१५ व आ.व. २०१५-१६ साठीची कॅरींग कॉस्ट सह महसुली तुट व तृतीय नियंत्रण कालावधीकरीताची एकूण महसुली तुट यांच्या परिणाम स्वरुप एकूण महसुली तुट **रु. ५६,३७२ कोटी** इतकी असून त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| तपशिल | रक्कम (रू.कोटी) |
|---|---|
| आर्थिक वर्ष २०१४-१५ करीताची महसुली तुट | १,२७१ |
| आर्थिक वर्ष २०१५-१६ करीताची महसुली तुट | ४,०४४ |
| आर्थिक वर्ष २०१६-१७ करीताची महसुली तुट | ८,२८४ |

| तपशिल | रक्कम (रू.कोटी) |
|---|---|
| आर्थिक वर्ष २०१७-१८ करीताची महसुली तुट | ११,१९६ |
| आर्थिक वर्ष २०१८-१९ करीताची महसुली तुट | १४,५४८ |
| आर्थिक वर्ष २०१९-२० करीताची महसुली तुट | १५,७५० |
| बहुवर्षिय वीजदर याचिका च्या पुर्नविचार याचिकेचा (प्र.क्र. १२१/२०१५) कॅरींग कॉस्टसह परिणाम | १७७ |
| आ. व. २०१४-१५ व आ.व. २०१५-१६ साठीची कॅरींग कॉस्ट | ४२४ |
| मुळाप्रवरा संदर्भात मा. आयोगाच्याआदेशाचा परिणाम (प्र. क्र. २४/२०१२ ) | ६७९ |
| **महावितरणची एकूण महसुलातील तुट** | **५६,३७२** |

### ई) वीजदर संरचना

महावितरण येथे असे नमूद करु इच्छिते की, वीज क्षेत्र टिकून राहण्याकरीता ग्राहकांना पुरविण्यात येणा-या वीज खर्चाची वसुली तातडीने होणे गरजेचे आहे. मा. आयोग ग्राहकांचा वीजदर ठरविताना विदयुत अधिनियम २००३ व राष्ट्रीय वीजदर धोरण यांचा अवलंब करीत असते. तसेच मा. आयोगाने वीज ग्राहकांना पुरविण्यात येणा-या सेवांचा दर्जा वाढावा याकरीता सतत प्रोत्साहन दिलेले आहे. याच तत्वावर मा. आयोगाने महावितरणची आर्थिक स्थिती देखील अबाधित राहील याचा देखील विचार करण्यात यावा ही विनंती करण्यात येत आहे.

महावितरणने प्रस्तावित केलेली वीजदर संरचना ही पुढील तत्वांवर आधारीत आहे.

- खर्चाची पुर्णतः वसुली.
- स्थिर खर्चाचे वाजवीकरण.
- अतिरिक्त अधिभाराची प्रयोज्यता

### फ) वीजदर वाढीची कारणे

महावितरणची एकूण प्रस्तावित रु. ५६,३७२ कोटी रुपयांची महसुली तुट भरुन काढण्या करिता महावितरण स्थिर आकार व वीज आकारांमध्ये वाढ करण्याचे प्रस्तावित करीत आहे. सदर दरवाढ ही देश पातळीवर असणाऱ्या महागाई निर्देशांकास अनुसरुन आहे. तथापि म.वि.नि.आ.(नुतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन) विनियम २०१६, दरमहा मेरीट ऑर्डर डिस्पॅच नुसार केलेले वीज खरेदीचे अनुमान, ग्राहक संरचनेतील बदल, मुळा प्रवरा संबधांतील व्हिलींग चार्जेसबाबतचा मा. आयोगाचा आदेश, केंद्रिय विद्युत प्राधिकरणाच्या विनियमामध्ये झालेल्या बदलांमुळे पॉईंट ऑफ कनेक्शन चार्जेसमध्ये झालेली वाढ तसेच वीज विक्रीद्वारे मिळणाऱ्या महसुलात झालेली घट इ. बाबींचा विचार करता महावितरणला वीज दरवाढ अपेक्षित आहे.

सदर एकुण दरवाढ ही महागाई दरावर मात करण्या करीता व उपरोक्त नमुद विविध घटकांमुळे निर्माण होणारे वाढीव खर्च, जे महावितरणच्या नियंत्रणाच्या बाहेरआहेत, भरुन काढण्याकरीता आवश्यक आहे.

तसेच येथे खालील निर्देशांकांचा देखील उल्लेख येथे करण्यात येत आहे.

- इंधन व कोळसा यांचा गेल्या १० वर्षाचा सरासरी घाऊक किंमत निर्देशांक अनुक्रमे ६.६९ % व ८.४६% इतका आहे.
- सहा महिन्यांनी होणारी सरासरी महागाई भत्त्यातील ८ % वाढ, दुरुस्ती व देखभाली करीता लागणाऱ्या तांब्याच्या तारा, इलेक्ट्रीकल साहित्य, रोहीत्रे यांचा गेल्या १० वर्षाचा घाऊक किंमत निर्देशांक अनुक्रमे ८.३१% , ३.३५% व ४.९७% आहे.
- वार्षिक सरासरी महागाई निर्देशांक ५.८८ % व गेल्या १५ वर्षाकरीताचा महागाई निर्देशांक ६.९६% इतका आहे.
- महावितरणच्या खर्चाच्या विविध घटकांमध्ये साधारणतः गेल्या पाच वर्षामध्ये ८% दरवाढ झाल्याचे दिसुन आले आहे.

तसेच महागाई निर्देशांक वाढीचा ५% ते ८% कल बघता, महावितरण सदर दरवाढ प्रस्तावित करत आहे.

### च) वहन आकार (व्हिलींग चार्जेस)

वितरण प्रणाली व पुरवठा खर्च विलगीकरण गुणोत्तराचा विचार करता व मा. आयोगाने दि.२ डिसेंबर २०१० च्या पुर्नविचार याचिकेद्वारे निर्धारीत केलेल्या पध्द्तीनुसार आणि लघुदाबावर मुक्त प्रवेश परवाना घेणा-या ग्राहकांची वितरण हानी लक्षात घेता महावितरण वहन आकार व वहन हानी उच्चदाब व लघुदाब पातळी करीता पुढील तक्त्यात नियंत्रण कालावधी करीता प्रस्तावित करीत आहे.

| तपशिल | आर्थिक वर्ष २०१६-१७ | | आर्थिक वर्ष २०१७-१८ | | आर्थिक वर्ष २०१८-१९ | | आर्थिक वर्ष २०१९-२० | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वहन हानी % | वहन आकार (रु.प्रति युनिट) | वहन हानी % | वहनआकार (रु.प्रति युनिट) | वहन हानी % | वहनआकार (रु.प्रति युनिट) | वहन हानी % | वहनआकार (रु.प्रति युनिट) |
| ३३ केव्ही स्तर | ६% | ०.१५ | ६% | ०.१७ | ६% | ०.२० | ६% | ०.२२ |
| २२/११ केव्ही स्तर | ९% | ०.८६ | ९% | ०.९६ | ९% | १.१५ | ९% | १.२२ |
| लघुदाब स्तर | १२% | १.३३ | १२% | १.४९ | १२% | १.७७ | १२% | १.८९ |

**छ) क्रॉस सबसिडी अधिभार**

दि. २८ जानेवारी २०१६ रोजी पारीत झालेल्या सुधारीत राष्ट्रीय वीजदर धोरणामध्ये नमुद केलेल्या पद्धतीनुसार क्रॉस सबसिडी अधिभाराची गणना करण्यात आली आहे. औदयोगिक ग्राहकांसाठी गणना केलेला क्रॉस सबसिडी अधिभार येथे दर्शविण्यात आला आहे.

**(रु. प्रती युनिट)**

| प्रवर्ग | आर्थिक वर्ष २०१६-१७ | आर्थिक वर्ष २०१७-१८ | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| **उच्चदाब वर्गवारी** | | | | |
| **उच्चदाब १ औद्योगिक** | | | | |
| एक्सप्रेस फिडर | १.७७ | १.९० | २.०४ | २.१४ |
| नॉन एक्सप्रेस फिडर | १.६५ | १.७७ | १.९० | १.९९ |
| हंगामी उद्योग | २.४९ | २.६८ | २.९१ | ३.०७ |
| **लघुदाब वर्गवारी** | | | | |
| **लघुदाब ५ अ औद्योगिक-यंत्रमाग** | | | | |
| ० ते २० कि.वॅ. | - | - | - | - |
| २० कि.वॅ.पेक्षा अधिक | १.१२ | १.४३ | १.६५ | १.८२ |
| **लघुदाब ५ ब औद्योगिक** | | | | |
| ० ते २० कि.वॅ. | - | - | - | - |
| २० कि.वॅ.पेक्षा अधिक | १.७५ | १.८८ | २.०१ | २.०९ |

वितरण मुक्त प्रवेश विनियमामध्ये ठरविल्याप्रमाणे क्रॉस सबसिडी अधिभार हा ग्राहकांच्या वीजदर प्रवर्ग / वीजदरांचे टप्पे / किंवा व्होल्टेज पातळीवर जोडलेल्या ग्राहकांच्या सध्याच्या क्रॉस सबसिडी पातळीवर आधारित आहे. जे ग्राहक मुक्त प्रवेश घेऊ इच्छितात अशा ग्राहकांकडूनच क्रॉस सबसिडीची वसुली व्हावी जेणे करुन सर्वसामान्य ग्राहकांवर वीजदर वाढीचा बोजा पडू नये.

**ज) अतिरिक्त अधिभार**

महावितरणने दि. १ ऑगस्ट २०११ पासून संपुर्ण महाराष्ट्रात आंतरराज्य अेबीटी (ABT) मीटरींग पध्दतीचा अवलंब करण्यास सुरूवात केली आहे. वितरण मुक्त प्रवेश घेऊ इच्छीणा-या ग्राहकांना एसएलडीसी/ वितरण परवाना धारक हे वितरण मुक्त प्रवेश विनियम २०१६ नुसार परवानगी देत आहेत.

मुक्त प्रवेश परवानगी दिल्यामुळे महावितरणला मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे. कारण महावितरणने सर्व ग्राहकांचा विचार करता दिर्घकालीन वीज खरेदी करार केलेले आहेत. मुक्त प्रवेशामुळे

मागणी अभावी सदर वीजनिर्मिती क्षमता मोठया प्रमाणात वापराविना पडून राहणार असली तरी करारानुसार सदर वीजनिर्मिती धारकाला स्थिर खर्चापोटीचा स्थिर आकार देणे बंधनकारक आहे.

त्यामुळे महावितरण राष्ट्रीय वीज धोरण, राष्ट्रीय वीजदर धोरण व वितरण मुक्त प्रवेश विनियम २०१६ अनुसार मुक्त प्रवेश घेऊ इच्छिणा-या ग्राहकांवर अशा प्रकारे वापरविना पडून राहणा-या वीज निर्मिती क्षमतेच्या स्थिर खर्चाच्या वसुली पोटी अतिरिक्त अधिभार लागू करण्याची मा.आयोगास विनंती करीत आहे.

**घ) व्होल्टेज निहाय वीजपुरवठा खर्च.**

महावितरण येथे नमुद करू इच्छिते की, व्होल्टेज निहाय वीजपुरवठा खर्चाची प्रत्यक्षात नोंद करण्याचे प्राविधान महावितरणच्या सध्याच्या जमाखर्चाचा हिशोब ठेवण्याच्या पध्दतीत नाही, तथापि मा. विद्युत अपिलीय प्राधिकरणाच्या आदेशास अधिनस्त राहून केलेल्या काही गृहितीकां नुसार वीजपुरवठा खर्चाचे व्होल्टेज निहाय वर्गीकरण करण्यात आलेले आहे.

वीज खरेदी व वीज वहन खर्च यांचे वर्गीकरण इनपुट पातळीवरील व्होल्टेज वीज हानी अतिउच्चदाब पातळीसाठी ०%, उच्चदाब पातळीसाठी ३% व लघुदाब पातळीकरिता २०.८६% गृहीत धरुन काढण्यात आले आहे. इतर खर्चाची विक्रीच्या गुणोत्तराच्या प्रमाणात गणना करण्यात आली आहे.

व्होल्टेज निहाय पुरवठा खर्च पुढील तक्त्यात दर्शविण्यात देत आहे.

(रु. प्रती युनिट)

| **व्होल्टेज पातळी** | **आर्थिक वर्ष २०१६-१७** | **आर्थिक वर्ष २०१७-१८** | **आर्थिक वर्ष २०१८-१९** | **आर्थिक वर्ष २०१९-२०** |
|---|---|---|---|---|
| अतिउच्चदाब | ५.८५ | ६.०६ | ६.२८ | ६.३० |
| उच्चदाब | ६.१३ | ६.३५ | ६.५८ | ६.५९ |
| लघुदाब | ७.०२ | ७.२४ | ७.४६ | ७.४६ |
| एकूण | ६.७१ | ६.९३ | ७.१६ | ७.१६ |

**च) वीजदराची प्रयोज्यता (ॲप्लीकॅबीलीटी)**

प्रत्येक ग्राहकांची वीजदरांची प्रयोज्यता (Tariff Applicability) ही ग्राहकांचा वीज वापर, वीज वापराचा हेतु, ग्राहक वर्गवारी इ. बाबींवर अवलंबून असते.

मा. आयोगाने याप्रमाणे ग्राहकांची वर्गवारी केलेली आहे. तरीसुध्दा ग्राहकांचे विशिष्ट वर्गवारीमध्ये वर्गीकरण केल्याने न्यायालयीन दावे दाखल करण्यात वाढ झाल्याचे दिसून येते. त्यामुळे महावितरणने सदर विषयाचा सखोलपणे अभ्यास करुन तसेच क्षेत्रीय अधिका-यांशी विचारविनिमय करुन शक्य तितक्या प्रमाणात सर्वसमावेशक वीजदर प्रयोज्यता प्रस्तावित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याप्रमाणे महावितरणने प्रस्तावित वीजदर प्रयोज्यता सादर केलेली आहे.

**छ) वीजदर पत्रक**

वर्गवारी / प्रवर्गनिहाय प्रचलित व प्रस्तावित वीजदरांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

**विद्युत आकार**

| प्रवर्ग | विद्युत आकार (पैसे /युनीट) | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यमान दर | प्रस्तावित दर आ.व. १७ | % आ.व. १६ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. १८ | % आ.व. १७ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. १९ | % आ.व. १८ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. २० | % आ.व. १९ च्या तुलनेत |
| **उच्चदाब - १ औद्योगिक** | | | | | | | | | |
| उच्चदाब-१ अविरत (एक्सप्रेस फिडर) | ७२१ | ७६१ | ५.५०% | ८११ | ६.५५% | ८६४ | ६.५६% | ९०२ | ४.४४% |
| उच्चदाब अविरत नसलेले (नॉन एक्सप्रेस फिडर) | ६७१ | ७०८ | ५.५०% | ७५४ | ६.५६% | ८०४ | ६.५६% | ८३९ | ४.४५% |
| उच्चदाब-हंगामी | ७८० | ८२३ | ५.५०% | ८७७ | ६.५६% | ९३४ | ६.५६% | ९७६ | ४.४५% |
| **उच्चदाब-२ वाणिज्यिक** | | | | | | | | | |
| उच्चदाब-२ अविरत (एक्सप्रेस फिडर) | १,११५ | १,१८८ | ६.५६% | १,२६६ | ६.५६% | १,३४९ | ६.५६% | १,४०९ | ४.४५% |
| उच्चदाब-२ अविरत नसलेले (नॉन एक्सप्रेस फिडर) | १,०६२ | १,१३२ | ६.५६% | १,२०६ | ६.५६% | १,२८५ | ६.५६% | १,३४२ | ४.४४% |
| **उच्चदाब-३ रेल्वे** | ८४६ | ८९३ | ५.५०% | ९५१ | ६.५६% | १,०१३ | ६.५६% | १,०५८ | ४.४५% |
| **उच्चदाब-४ सार्वजनिक पाणीपुरवठा** | | | | | | | | | |
| उच्चदाब-४ अविरत (एक्सप्रेस फिडर) | ५६४ | ५९५ | ५.५०% | ६५४ | ९.९८% | ७२० | ९.९८% | ७५२ | ४.४५% |
| उच्चदाब-४ अविरत नसलेले (नॉन एक्सप्रेस फिडर) | ५४२ | ५७२ | ५.५०% | ६२९ | ९.९८% | ६९२ | ९.९८% | ७२२ | ४.४४% |
| **उच्चदाब-५ कृषी** | | | | | | | | | |
| **कृषीपंप** | ३३२ | ३५० | ५.५०% | ३८५ | ९.९८% | ४२४ | ९.९८% | ४४३ | ४.४५% |
| **कृषी- इतर** | | ४५० | | ४९५ | ९.९८% | ५४५ | ९.९८% | ५६९ | ४.४५% |
| **उच्चदाब-६ एकगठ्ठा पुरवठा** | ५८१ | ६१३ | ५.५०% | ६७४ | ९.९८% | ७४१ | ९.९८% | ७७४ | ४.४४% |
| **उच्चदाब-८ तात्पुरता पुरवठा** | १,२५० | १,३१९ | ५.५०% | १,४५० | ९.९८% | १,५९५ | ९.९८% | १,६६६ | ४.४४% |
| **उच्चदाब-९ सार्वजनिक सेवा-शासकिय** | | | | | | | | | |
| उच्चदाब-९ अविरत (एक्सप्रेस फिडर) | ७२० | ७६० | ५.५०% | ८३५ | ९.९८% | ९१९ | ९.९८% | ९६० | ४.४५% |
| उच्चदाब-९ अविरत नसलेले (नॉन एक्सप्रेस फिडर) | ६६० | ६९६ | ५.५०% | ७६६ | ९.९८% | ८४२ | ९.९८% | ८८० | ४.४५% |
| **उच्चदाब-९ सार्वजनिक सेवा-इतर** | | | | | | | | | |
| उच्चदाब-९ अविरत (एक्सप्रेस फिडर) | ८८९ | ९३८ | ५.५०% | १,०३२ | ९.९८% | १,१३५ | ९.९८% | १,१८५ | ४.४४% |
| उच्चदाब-९ अविरत नसलेले (नॉन एक्सप्रेस फिडर) | ८४१ | ८८७ | ५.५०% | ९७६ | ९.९८% | १,०७३ | ९.९८% | १,१२१ | ४.४५% |
| **उच्चदाब-१० पोर्टस्** | १,०९१ | १,१५१ | ५.५०% | १,२६६ | ९.९८% | १,३९२ | ९.९८% | १,४५४ | ४.४५% |
| **उच्च दाब ११ - मेट्रो /मोनोरेल** | ८४६ | ८९३ | ५.५०% | ९८२ | ९.९८% | १,०८० | ९.९८% | १,१२८ | ४.४५% |

| प्रवर्ग | विद्यमान दर | प्रस्तावित दर आ.व. १७ | % आ.व. १६ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. १८ | % आ.व. १७ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. १९ | % आ.व. १८ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. २० | % आ.व. १९ च्या तुलनेत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **लघु दाब -१ घरगुती** | | | | | | | | | |
| बीपीएल (०-३० युनिटस्) | ८७ | ९२ | ५.५०% | १०१ | ९.८३% | १११ | ९.८३% | ११६ | ४.४५% |
| **लघु दाब - घरगुती** | | | | | | | | | |
| ०-१०० युनिटस् | ३७६ | ३९७ | ५.५०% | ४३६ | ९.८३% | ४७८ | ९.८३% | ५०० | ४.४४% |
| १०१-३०० युनिटस् | ७२१ | ७६१ | ५.५०% | ८३५ | ९.८३% | ९१७ | ९.८३% | ९५८ | ४.४४% |
| ३०१-५०० युनिटस् | ९९५ | १,०५० | ५.५०% | १,१५३ | ९.८३% | १,२६६ | ९.८३% | १,३२२ | ४.४५% |
| ५०१-१००० युनिटस् | १,१३१ | १,१९३ | ५.५०% | १,३१० | ९.८३% | १,४३९ | ९.८३% | १,५०३ | ४.४४% |
| १००० युनिटस् पेक्षा अधिक | १,२५० | १,३१९ | ५.५०% | १,४४८ | ९.८३% | १,५९१ | ९.८३% | १,६६१ | ४.४४% |
| **लघु दाब -२ बिगर घरगुती** | | | | | | | | | |
| **० - २० किवॅ** | | | | | | | | | |
| ० -१०० युनिटस् | ६६० | ७६२ | १५.५२% | ८३७ | ९.७२% | ९२० | ९.९८% | ९६१ | ४.४५% |
| १०० युनिटसच्या पेक्षा अधिक | ९६२ | १,१११ | १५.५२% | १,२१९ | ९.७२% | १,३४१ | ९.९८% | १,४०१ | ४.४४% |
| >२० - ५० किवॅ | १,०२० | १,१९४ | १७.११% | १,३१३ | ९.९३% | १,४४४ | ९.९८% | १,५०८ | ४.४४% |
| ५० किवॅ पेक्षा अधिक | १,३०१ | १,३७३ | ५.५०% | १,४९१ | ८.६६% | १,६२१ | ८.६६% | १,६९३ | ४.४५% |
| **लघु दाब - ३ सार्वजणिक पाणी पुरवठा** | | | | | | | | | |
| ० - २० किवॅ | २७० | २८५ | ५.५०% | ३१३ | ९.९८% | ३४५ | ९.९८% | ३६० | ४.४४% |
| २० - ४० किवॅ | ३८० | ४०१ | ५.५०% | ४४१ | ९.९८% | ४८५ | ९.९८% | ५०७ | ४.४५% |
| ४० किवॅ पेक्षा अधिक | ५०० | ५२८ | ५.५०% | ५८० | ९.९८% | ६३८ | ९.९८% | ६६६ | ४.४५% |
| **लघु दाब - ४ कृषि** | | | | | | | | | |
| मीटर रहित (रु./अ.श./महिना) | | | | | | | | | |
| वार्षिक > १३१८ तास / अ.श. /वर्ष वापराचे प्रमाण असलेली परिमंडळे | | | | | | | | | |
| ०-५ एच पी | ३७४ | ३९५ | ५.५०% | ४३४ | ९.९६% | ४७७ | ९.९७% | ४९८ | ४.४४% |
| ५ एच पी पेक्षा जास्त | ४०६ | ४२८ | ५.५०% | ४७१ | ९.९५% | ५१८ | ९.९९% | ५४१ | ४.४४% |
| वार्षिक <१३१८ तास / अ.श.वापराचे प्रमाण असलेली परिमंडळे | | | | | | | | | |
| ०-५ एच पी | २८३ | २९९ | ५.५०% | ३२७ | ९.६६% | ३५९ | ९.५४% | ३७५ | ४.४४% |
| ५ एच पी पेक्षा जास्त | ३१० | ३२७ | ५.५०% | ३५९ | ९.७५% | ३९४ | ९.६७% | ४११ | ४.४४% |
| मीटरचे दर कृषीपंप | २५८ | २७२ | ५.५०% | २९९ | ९.९८% | ३२९ | ९.९८% | ३४४ | ४.४५% |
| मीटरचे दर - कृषि इतर | ३६० | ३८० | ५.५०% | ४१८ | ९.९८% | ४५९ | ९.९८% | ४८० | ४.४५% |
| ***लघु दाब ५ - उद्योग - यंत्रमाग*** | | | | | | | | | |
| ०-२०किवॅ | ५४३ | ५७३ | ५.५०% | ६१० | ६.५६% | ६५० | ६.५६% | ६७९ | ४.४४% |
| २० - किवॅ पेक्षा अधिक | ६८८ | ७२६ | ५.५०% | ७७३ | ६.५६% | ८२४ | ६.५६% | ८६१ | ४.४५% |
| ***लघु दाब ५ - उद्योग - इतर*** | | | | | | | | | |
| ० - २० किवॅ | ५५१ | ५८१ | ५.५०% | ६१९ | ६.५६% | ६६० | ६.५६% | ६८९ | ४.४५% |
| २० - किवॅ पेक्षा अधिक | ६९८ | ७३६ | ५.५०% | ७८५ | ६.५६% | ८३६ | ६.५६% | ८७३ | ४.४४% |
| **लघु दाब -६ : पथदिवे** | | | | | | | | | |
| ग्रामपंचायत अ,ब आणि क श्रेणीच्या नगरपालिका | ४७८ | ५०४ | ५.५०% | ५५५ | ९.९८% | ६१० | ९.९८% | ६३७ | ४.४४% |
| महानगरपालिका | ५८० | ६१२ | ५.५०% | ६७३ | ९.९८% | ७४० | ९.९८% | ७७३ | ४.४४% |
| **लघुदाब ७- तात्पुरता पुरवठा** | | | | | | | | | |
| तात्पुरत्या जोडण्या (अन्य प्रयोजन) | १,५०० | १,५८३ | ५.५०% | १,७४० | ९.९८% | १,९१४ | ९.९८% | १,९९९ | ४.४४% |

| प्रवर्ग | विद्युत आकार (पैसे /युनीट) | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यमान दर | प्रस्तावित दर आ.व. १७ | % आ.व. १६ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. १८ | % आ.व. १७ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. १९ | % आ.व. १८ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. २० | % आ.व. १९ च्या तुलनेत |
| तात्पुरत्या जोडण्या (धार्मिक प्रयोजन) | ३७१ | ३९१ | ५.५०% | ४३० | ९.९८% | ४७३ | ९.९८% | ४९५ | ४.४४% |
| **लघुदाब-८ जाहिराती आणि प्रसिध्दी फलक** | १,७०० | १,७९४ | ५.५०% | १,९७३ | ९.९८% | २,१६९ | ९.९८% | २,२६६ | ४.४४% |
| **लघुदाब ९ - स्मशानभुमी व दफणभुमी** | ३९१ | ४१३ | ५.५०% | ४५४ | ९.९८% | ४९९ | ९.९८% | ५२१ | ४.४५% |
| **लघुदाब-१० सार्वजनिक सेवा-शासकिय** | | | | | | | | | |
| ०-२०० युनिटस | ४५४ | ४७९ | ५.५०% | ५२७ | ९.९८% | ५७९ | ९.९८% | ६०५ | ४.४५% |
| >२०० युनिटस | ५८४ | ६१६ | ५.५०% | ६७८ | ९.९८% | ७४५ | ९.९८% | ७७८ | ४.४५% |
| >२०-५० कि.वॅ. | ६५० | ६८६ | ५.५०% | ७५४ | ९.९८% | ८३० | ९.९८% | ८६६ | ४.४५% |
| >५० कि.वॅ. | ७२० | ७६० | ५.५०% | ८३५ | ९.९८% | ९१९ | ९.९८% | ९६० | ४.४५% |
| **लघुदाब-१० सार्वजनिक सेवा- इतर** | | | | | | | | | |
| ०-२०० युनिटस | ४९२ | ५१९ | ५.५०% | ५७१ | ९.९८% | ६२८ | ९.९८% | ६५६ | ४.४५% |
| >२०० युनिटस | ७२२ | ७६२ | ५.५०% | ८३८ | ९.९८% | ९२१ | ९.९८% | ९६२ | ४.४४% |
| >२०-५० कि.वॅ. | ७३२ | ७७२ | ५.५०% | ८४९ | ९.९८% | ९३४ | ९.९८% | ९७६ | ४.४५% |
| >५० कि.वॅ. | ७६८ | ८१० | ५.५०% | ८९१ | ९.९८% | ९८० | ९.९८% | १,०२४ | ४.४५% |
| **लघुदाब-११ पोर्टस** | | १,१५१ | | १,२६६ | ९.९८% | १,३९२ | ९.९८% | १,४५४ | ४.४५% |

**स्थिर आकार** (रु/जोडणी/महिना अथवा रु/केव्हीए/महिना )

| प्रवर्ग | विद्यमान दर | प्रस्तावित दर आ.व. १७ | % आ.व. १६ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. १८ | % आ.व. १७ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. १९ | % आ.व. १८ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. २० | % आ.व. १९ च्या तुलनेत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **उच्चदाब - १ औद्योगिक** | | | | | | | | | |
| उच्चदाब-१ अविरत (एक्सप्रेस फिडर) | २२० | २३५ | ६.८६% | २५५ | ८.४८% | २८० | ९.८१% | २९५ | ५.५०% |
| उच्चदाब-१ अविरत नसलेले (नॉन एक्सप्रेस फिडर) | २२० | २३५ | ६.८६% | २५५ | ८.४८% | २८० | ९.८१% | २९५ | ५.५०% |
| उच्चदाब-१- हंगामी | २२० | २३५ | ६.८६% | २५५ | ८.४८% | २८० | ९.८१% | २९५ | ५.५०% |
| **उच्चदाब-२ वाणिज्यिक** | | | | | | | | | |
| उच्चदाब-२ अविरत (एक्सप्रेस फिडर) | २२० | २३५ | ६.८६% | २५५ | ८.४८% | २८० | ९.८१% | २९५ | ५.५०% |
| उच्चदाब-२ अविरत नसलेले (नॉन एक्सप्रेस फिडर) | २२० | २३५ | ६.८६% | २५५ | ८.४८% | २८० | ९.८१% | २९५ | ५.५०% |
| **उच्चदाब-४ सार्वजनिक पाणीपुरवठा** | | | | | | | | | |
| उच्चदाब-४ अविरत (एक्सप्रेस फिडर) | २२० | २३५ | ६.८६% | २५५ | ८.४८% | २८० | ९.८१% | २९५ | ५.५०% |
| उच्चदाब-४ अविरत नसलेले (नॉन एक्सप्रेस फिडर) | २२० | २३५ | ६.८६% | २५५ | ८.४८% | २८० | ९.८१% | २९५ | ५.५०% |
| **उच्चदाब-५ कृषी** | | | | | | | | | |
| **कृषीपंप** | ३० | ३५ | १५.५०% | ४५ | २८.५९% | ५५ | २३.४६% | ५८ | ५.५०% |
| **कृषि इतर** | | ५० | | ६४ | २८.५९% | ७९ | २३.४६% | ८३ | ५.५०% |
| **उच्चदाब-६ एकगठ्ठा पुरवठा** | २२० | २३५ | ६.८६% | २५५ | ८.४८% | २८० | ९.८१% | २९५ | ५.५०% |
| **उच्चदाब-८ तात्पुरता पुरवठा** | २९० | ३१० | ६.८८% | ३३५ | ८.२४% | ३६५ | ८.९३% | ३८६ | ५.५०% |
| **उच्चदाब-९ सार्वजनिक सेवा -** | | | | | | | | | |

| प्रवर्ग | विद्यमान दर | प्रस्तावित दर आ.व. १७ | % आ.व. १६ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. १८ | % आ.व. १७ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. १९ | % आ.व. १८ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. २० | % आ.व. १९ च्या तुलनेत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **शासकिय** | | | | | | | | | |
| उच्चदाब-९ अविरत (एक्सप्रेस फिडर) | २२० | २३५ | ६.८६% | २५५ | ८.४८% | २८० | ९.८१% | २९५ | ५.५०% |
| उच्चदाब-९ अविरत नसलेले (नॉन एक्सप्रेस फिडर) | २२० | २३५ | ६.८६% | २५५ | ८.४८% | २८० | ९.८१% | २९५ | ५.५०% |
| **उच्चदाब-९ सार्वजनिक सेवा - इतर** | | | | | | | | | |
| उच्चदाब-९ अविरत (एक्सप्रेस फिडर) | २२० | २३५ | ६.८६% | २५५ | ८.४८% | २८० | ९.८१% | २९५ | ५.५०% |
| उच्चदाब-९ अविरत नसलेले (नॉन एक्सप्रेस फिडर) | २२० | २३५ | ६.८६% | २५५ | ८.४८% | २८० | ९.८१% | २९५ | ५.५०% |
| **उच्चदाब-१० पोर्टस्** | २२० | २३५ | ६.८६% | २५५ | ८.४८% | २८० | ९.८१% | २९५ | ५.५०% |
| **उच्च दाब ११ - मेट्रो /मोनोरेल** | २२० | २३५ | ६.८६% | २५५ | ८.४८% | २८० | ९.८१% | २९५ | ५.५०% |

| प्रवर्ग | विद्यमान दर | प्रस्तावित दर आ.व. १७ | % आ.व. १६ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. १८ | % आ.व. १७ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. १९ | % आ.व. १८ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. २० | % आ.व. १९ च्या तुलनेत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| लघुदाब - १ घरगुती | | | | | | | | | |
| बीपीएल (०-३० युनिट) | १० | ११ | ५.५०% | १२ | ९.९८% | १३ | ९.९८% | १३ | ५.५०% |
| **३० युनिट पेक्षा अधिक** | | | | | | | | | |
| १-१०० युनिट | ५० | ७५ | ५०% | १०० | ३३% | १२५ | २५% | १५० | २०% |
| १०१-३०० युनिट | ५० | १०० | १००% | १२५ | २५% | १५० | २०% | १७५ | १७% |
| ३०१-५०० युनिट | ५० | १०० | १००% | १२५ | २५% | १५० | २०% | १७५ | १७% |
| ५००-१००० युनिट | ५० | १२५ | १५०% | १५० | २०% | १७५ | १७% | २०० | १४% |
| > १००० युनिट | ५० | १२५ | १५०% | १५० | २०% | १७५ | १७% | २०० | १४% |
| ३ फेज जोडणी | १५० | १६० | ६.८३% | १८५ | १५.४८% | २१० | १३.६१% | २३५ | ११.६८% |
| **लघुदाब-२ बिगर घरगुती** | | | | | | | | | |
| ०-२० कि.वॅ. | | | | | | | | | |
| ०-१०० युनिट | २२० | २३५ | ६.८६% | २५५ | ८.४८% | २८० | ९.८१% | २९५ | ५.५०% |
| १०० युनिट पेक्षा अधिक | २२० | २३५ | ६.८६% | २५५ | ८.४८% | २८० | ९.८१% | २९५ | ५.५०% |
| >२०-५० कि.वॅ. | २२० | २३५ | ६.८६% | २५५ | ८.४८% | २८० | ९.८१% | २९५ | ५.५०% |
| >५० कि.वॅ. | २२० | २३५ | ६.८६% | २५५ | ८.४८% | २८० | ९.८१% | २९५ | ५.५०% |
| **लघुदाब- ३ सार्वजनिक पाणीपुरवठा** | | | | | | | | | |
| ०-२० कि.वॅ. | ६० | ६५ | ८.८३% | ८० | २२.३५% | ९५ | १९.२७% | १०१ | ५.५०% |
| २०-४० कि.वॅ. | ७० | ७५ | ६.९३% | ९० | २०.२०% | १०५ | १६.६२% | १११ | ५.५०% |
| ४० किवॅ पेक्षा अधिक | १०५ | ११५ | ९.३१% | १३५ | १७.७०% | १५५ | १४.३८% | १६३ | ५.५०% |
| **लघुदाब - ४ कृषी** | | | | | | | | | |
| मीटरचे दर - कृषीपंप | २० | २२ | १०.५०% | २५ | १४.५५% | ३० | १७.३५% | ३१ | ५.५०% |
| कृषि मीटर - इतर | ५० | ५५ | ९.५०% | ७० | २७.४२% | ८५ | २१.२७% | ८९ | ५.५०% |
| **लघुदाब- ५ औद्योगिक- यंत्रमाग** | | | | | | | | | |
| ०-२० कि.वॅ. | २२० | २३५ | ६.८६% | २६० | १०.३९% | २८५ | ९.७४% | ३०० | ५.५०% |
| २० कि.वॅ. पेक्षा अधिक | १५० | १६० | ६.८३% | १८० | १२.३६% | २०० | ११.३३% | २११ | ५.५०% |

| प्रवर्ग | विद्यमान दर | प्रस्तावित दर आ.व. १७ | % आ.व. १६ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. १८ | % आ.व. १७ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. १९ | % आ.व. १८ च्या तुलनेत | प्रस्तावित दर आ.व. २० | % आ.व. १९ च्या तुलनेत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **लघुदाब- ५ औद्योगिक- इतर** | | | | | | | | | |
| ०-२० कि.वॅ. | २२० | २३५ | ६.८६% | २६० | १०.३९% | २८५ | ९.७४% | ३०० | ५.५०% |
| २० कि.वॅ. पेक्षा अधिक | १५० | १६० | ६.८३% | १८० | १२.३६% | २०० | ११.३३% | २११ | ५.५०% |
| **लघुदाब- ६ पथ दिवे** | | | | | | | | | |
| ग्रामपंचायत अ,ब, आणि क गटातील व नगरपालिका | ५० | ५५ | ९.५०% | ७० | २७.४२% | ८५ | २१.२७% | ८९ | ५.५०% |
| महानगरपालिका | ५० | ५५ | ९.५०% | ७० | २७.४२% | ८५ | २१.२७% | ८९ | ५.५०% |
| **लघुदाब-७ तात्पुरता विद्युत पुरवठा** | | | | | | | | | |
| तात्पुरत्या जोडण्या (अन्य प्रयोजन) | ३६० | ३८० | ५.५०% | ४१५ | ९.३२% | ४५० | ८.३९% | ४७५ | ५.५०% |
| तात्पुरत्या जोडण्या (धार्मिक प्रयोजन) | २९० | ३१० | ६.८८% | ३४० | ९.६९% | ३७० | ८.७४% | ३९० | ५.५०% |
| **लघुदाब-८ जाहिराती आणि प्रसिध्दी फलक** | ५७५ | ६१० | ६.०२% | ६५५ | ७.४७% | ७०५ | ७.६४% | ७४४ | ५.५०% |
| **लघुदाब-९ स्मशानभूमी आणि दफनभूमी** | २९० | ३१० | ६.८८% | ३४० | ९.८६% | ३७० | ८.५८% | ३९० | ५.५०% |
| **लघुदाब-१० सार्वजनिक सेवा - शासकिय** | | | | | | | | | |
| ०-२०० युनिटस | २२० | २३५ | ६.८६% | २६० | १०.३९% | २८५ | ९.७४% | ३०० | ५.५०% |
| >२०० युनिटस | २२० | २३५ | ६.८६% | २६० | १०.३९% | २८५ | ९.७४% | ३०० | ५.५०% |
| >२०-५० कि.वॅ. | २२० | २३५ | ६.८६% | २६० | १०.३९% | २८५ | ९.७४% | ३०० | ५.५०% |
| >५० कि.वॅ. | २२० | २३५ | ६.८६% | २६० | १०.३९% | २८५ | ९.७४% | ३०० | ५.५०% |
| **लघुदाब-१० सार्वजनिक सेवा - इतर** | | | | | | | | | |
| ०-२०० युनिटस | २२० | २३५ | ६.८६% | २६० | १०.३९% | २८५ | ९.७४% | ३०० | ५.५०% |
| >२०० युनिटस | २२० | २३५ | ६.८६% | २६० | १०.३९% | २८५ | ९.७४% | ३०० | ५.५०% |
| >२०-५० कि.वॅ. | २२० | २३५ | ६.८६% | २६० | १०.३९% | २८५ | ९.७४% | ३०० | ५.५०% |
| >५० कि.वॅ. | २२० | २३५ | ६.८६% | २६० | १०.३९% | २८५ | ९.७४% | ३०० | ५.५०% |
| **लघुदाब-११ पोर्टस** | | २३५ | | २५५ | ८.४८% | २८० | ९.८१% | २९५ | ५.५०% |

मा.आयोगास महावितरणची विनंती आहे कि, प्रस्तावित केलेले वीज दर, वीजदर संरचना, प्रस्तावित नविन वर्गवारी व इतर सुचनांचा विचार करुन वीजदरास मान्यता द्यावी.

**प्रार्थनाः**

**सन्माननीय आयोगास महावितरण कंपनीची आदरपूर्वक प्रार्थना आहे की :**

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय बीजदर) विनियम २०१५च्या तरतुदीनुसार सुधारीत बहुवर्षीय वीजदर याचिका मा. आयोगाने पुढील कार्यवाहीसाठी दाखल करून घ्यावी.

२. सदर याचिका दाखल करण्यास झालेल्या प्रलंबाबद्दल मा.आयोगाने सुट द्यावी.

३. महावितरण कंपनीने आर्थिक वर्ष २०१४-१५ ते २०१९-२० साठी प्रस्तावित केलेली एकूण महसुलाची गरज व एकूण महसुली तुट इतर दाव्यासह वसुल करण्यास परवानगी दयावी.

४. केंद्रीय विद्युत नियामक आयोग (वीजदराच्या अटी व शर्ती) विनियम २०१४ नुसार केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने मंजूरी दिलेल्या केंद्र शासनाच्या वीज निर्मिती केंद्राच्या खर्चामध्ये काही बदल झाल्यास सदरअतिरिक्त खर्चाची वसुली आकार मार्फत करण्याची महावितरणला परवानगी मिळावी.

५. महावितरणने प्रस्तावित केलेल्या वीजदरांची तत्वे व इतर सुचनांचा विचार करून महसूली तुटीच्या वसुलीस व वीजदर पत्रकास मंजूरी मिळावी.

६. कृषी उच्चदाब व बंदरे / पोर्ट - लघुदाब ही स्वतंत्र वर्गवारी महावितरणतर्फे प्रलंबित करण्यात येत आहे. त्यास मा.आयोगाने मान्यता दयावी.

७. लघुदाब - व्यापारी या वर्गवारी अंतर्गत ०-२० कि.वॅ. या पातळीवर प्रस्तावित वर्गीकरणास मा. आयोगाने परवानगी दयावी ही विनंती.

८. महावितरणने प्रस्तावित केलेले प्रवर्गनिहाय वीजदर मंजूर करण्यात यावे.

९. मुक्त प्रवेश संबंधातील ग्राहकांसाठी आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आर्थिक वर्ष २०१९-२० साठी महावितरणने प्रस्तावित केलेले क्रॉस सबसिडी अधिभार व इतर सर्व आकार जसे वहन आकार व वहन हानी इत्यादी मंजूर करण्यात यावे.

१०. मुक्त प्रवेश घेऊ इच्छिणा-या ग्राहकांना आर्थिक वर्ष २०१६-१७ ते २०१९-२० साठी प्रस्तावित अतिरिक्त आकार लागू करावा.

११. वीजदर प्रयोज्यतेत महावितरणने सुचविलेले विविध प्रकारच्या उपक्रमासाठीचे वर्गवारीकरण मंजुर करण्यात यावे.

१२. भविष्यात जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा महावितरणला सध्याच्या आकार पत्रकात (Schedule of Charges) सुधारणा करण्यासाठी याचिका दाखल करण्याची परवानगी मिळावी.

१३. माननीय आयोगास योग्य वाटेल असे अन्य कोणतेही सहाय्य मंजूर करावे.

१४. माननीय आयोगास योग्य वाटेल असे अन्य कोणतेही आदेश, प्रकरणातील परिस्थिती तसेच न्यायहिताच्या दृष्टीने देण्यात यावेत.

१५. कोणतीही चूक / भुल झाली असल्यास ती क्षमापित करावी आणि ती सुधारण्याची संधी देण्यात यावी.

१६. सदर विनंती अर्ज सादर कर्त्यास या अर्जात गरज असल्यास वेळोवेळी कोणतीही भर टाकणे किंवा त्यात बदल करणे तसेच अतिरिक्त माहिती सादर करण्याची परवानगी देण्यात यावी.